# वरद स्तोत्र



श्री संत सद्गुरू वासुदेवराव देव महाराज

लेखक : डॉ. यशवंत बाळकृष्ण भुसनळे
एरंडोल, जि. जळगांव

।। श्री ।।

## श्री संत सदगुरू वासुदेवराव देव महाराज टेंभुर्णीकर

## वरद स्तोत्र

**श्री गणेशाय नमः । ॐ नमोजी गणनायका ।**

ऋद्धिसिद्धीच्या विनायका । सुखदाता विघ्ननाशका । शंकरात्मजा गणपते ।।१।। तुझे करिताची स्मरण । विघ्ने पळती जीव घेऊन । सद्‌गुरू स्तोत्र रचण्या पूर्ण । बुद्धि प्रदान दीजिये ।।२।। नमन माझे सरस्वती । सकल विद्या दाती । स्तविती अल्पमती । सिद्धीदाती तूच ।।३।। अवधूत श्री दत्तात्रेया । अनसूयात्रि तनया । सद्‌गुरू स्तोत्र लिहावया । आशीष द्यावा सद्‌गुरू ।।४।। आद्य गुरू जे आदिनाथ । सिद्धी केले नवनाथ । कुलस्वामिनीसहित । प्रणाम सतत सादर ।।५।। त्या पासोन काकासाहेब प्रख्यात । तिसरे राजाराम पंत । चौथे भाऊसाहेब प्रख्यात । पाचवे गुरूमह रंगनाथ ।।६।।

सहावे ते वासुदेव प्रख्यात । सर्वा माझा दंडवत । त्यांचा दास अनुग्रहित । यशवंत भुसनळे नामे ।।७।। नमन करितो गुरू परंपरी । अधिष्ठित जे ऱ्हदयमंदिरी । प्रार्थितो कर जोडोनि । कार्य सिद्धी करावी ।।८।। ज्याचेनी उदरी पावलो जनन । त्यासी सदैव नमन । माता सुशीला पिता बाळकृष्ण । ऋणी भुसनळे कुळीचा ।।९।। जन्म एक चक्रनगरी जाणी । प्रख्यात पवित्र तीर्थ अंजनी । पांडव राहिले ज्या स्थानी । कार्तवीर्या पावले गजानन ।।१०।। ऐसे पुण्यभूमीत वास । सत् संगती लाभ

विशेष । सद्‌गुरू वासदेव बोधामृत । बिंदुने पावलो संतुष्ट ।।११।। सद्‌गुरू वासुदेव देव । ज्या नसे ज्ञानाचा अभाव । आडनाव शोभे देव । टेंभुर्णीकर महाराज ।।१२।। पिताश्री नामे लक्ष्मण । नावात बोध किती महान । लक्ष ठेवी मनावर । ढळून दे कदापि ।।१३।। बालपणी अनाडपण । घरी शिकती पोथ्यापुराण । परी नावडे शाळेत जाण । माता चिंती सदैव ।।१४।। घरी नरसिंह संस्थान । त्या जरी तनखा इनामी जमीन । खाणारे घरात बरेच जण । आई बोध करी सदैव ।।१५।। सोळावे वर्षातच फानयल । सतरावे वर्षी मॅट्रिक पास । मिळवला त्यांनी फर्स्ट क्लास । नोकरी लागली सत्वर ।।१६।। कस्टम खात्यात छाप घालता । एक डोळा गेला आघातापरी न मनी खंत । त्यातच समाधान ।।१७।। प्राप्त स्थितीत समाधान मानणे । संत सद्‌गुरू महान । निवृत्ती ज्ञानदेव सोपान । शिकवी धडा आपणा ।।१८।। प्रारब्धाने घडत असते । दोष न द्यावा देवाते । पूर्वकर्म संचित घडते । कारणीभूत आपणच ।।१९।। श्रावणासी मारले दशरथाने । त्याचा शाप भोवला कर्माने ।। राम राम करीत मरणे । पुत्र विरह दु:खे ।।२०।। कैकेयी वना पाठवी श्रीरामासी । तेच कर्म लागले पाठीसी । देवकी म्हणून ये जन्मासी । भोगी कारावास अखेर ।।२१।। तोच राम धावून आला । कृष्ण जन्म घेतला । कारावासातून सोडवी मातापित्याला । मुक्त करी पूर्व कर्मा ।।२२।। रामाने मारिले वालीसी । वाली जन्मे पारधी कुळासी । राम अवतरला कृष्णासी । पारधी बाणे ये मृत्यू ।।२३।। सार्थ करा मानवकुडी । दुर्गुण पाठवा देशोधडी । सत्कर्म करा घडोघडी । हाच उपदेश संतांचा ।।२४।। आपण दुसऱ्याशी दुखावता । तेच कर्म नडेल पुढता ।

कृष्ण सांगे गीतार्थ । संतासी पाठवी उपदेशा ।।२५।। संत सद्‌गुरूचे धरा चरण । त्याविण ना उपाय जाण । फेरा चुकवी जन्ममरण । किती कष्टलो जाणता ।।२६।। जन्म दु:खाचा अंकुर । जन्म शोकाचा सागर । जन्म भयाचा डोंगर । अचल सर्वदा ।।२७।। जन्म अज्ञानाचे फळ । जन्म लोभाचे कमळ । जन्म भ्रांतीचे फळ । ज्ञानहीन ।।२८।। जन्म जिवासी बंधन । जन्म मृत्युसी कारण । जन्म हेचि अकारण । गुंतवी मोहजाळी ।।२९।। जन्म सुखाचा विसर । जन्म चिंतेचे आगर । जन्म वासना विस्तार । विस्तारिला ।।।३०।। जन्म मायेचे बंधन । जन्म क्रोधाचे कोंदण । जन्म मोक्षास अडचण । विघ्नाचे भांडार ।।३१।। जन्म जिवाचे मी पण । जन्म अहंतेचा गुण । जन्म हेचि विस्मरण । ईश्वराचे ।।३२।। पाहता शरीराचे मूळ । त्या ऐसे नाही अमंगळ । रजस्वलेचा जो विटाळ । गोठून बनला देह ।।३३।। वरीवरी दिसे वैभवाचे अंतरी पोतडे नरकाचे । रक्त वसा मांसाचे । झाकले कुंड चर्माने ।।३४।। पंचभूतात्मक शरीर । मन बुद्धि अहंकार । मायेचा हा खेळ । जाणा कोण घडवी ।।३५।। कुंड धुता शुद्ध होते । दररोज धुता त्याते । परी देह दुर्गंधी न धुता येते । शुद्ध न होय कदापि ।।३६।। अस्थि पंजर उभविला । सीरा नाडी गुंडाळला मेद मांसे लिंपविला सांदो सांदि भरोनी ।।३७।। नरकाचे कोठार भरले । आंत बाहेरी लिंपीले । मूत्र पोतडे जमले । दुर्गंधीचे ।।३८।। जंत किडे आणि आतडी । नाना दुर्गंधाची पोतडी । वरूनी चर्माची झापडी । त्यासी म्हणे माझे माझे ।।३९।। पोटी घालिता दिव्यान्न । त्याचे होय विष्ठा पूर्ण । गंगेचे पिता जीवन । त्याची होय लघुशंका ।।४०।। पोटी नसता मलमूत्र वोक । मरोन जाती सर्व लोक

। जरी असे राजा रंक । पोटी विष्ठा चुकेना ।।४१।। निर्मळपणे काढू जाता । तरी देह पडेल तत्वता । अशी मायेची व्यवस्था । रचिली ब्रह्माने ।।४२।। अन्न पाणी वर्ज्य करता । देह पडे मृत्युता । तेणे ह्या नरकुंडा । निर्मळ करण्या मार्ग नसे ।।४३।। अशा या कारागृही वसती । नवमास सोसे विपत्ती । नवही द्वारी निरोधती । हवा प्रकाश ना मुळीच ।।४४।। त्वत्तेविण गर्भ लोळे । पोषण होता बाळानाळे । तव मातेसी होत डोहाळे । कडू तिखट खाण्यासी ।।४५।। मी कोण? मला कां कोंडले । सोडवी देवा मोह जाळे । भाव भक्ती तारिले । तुम्ही कितीकास ।।४६।। तुझी करूणा मी वर्णु काय । जेव्हा होती गर्भात काय । तेथे कोण होते बाप माय । त्वाच वाचविले देवा ।।४७।। आणि उपजता तत्क्षणी । केली तुवा अघटित करणी । मांसाच्या दोन गोळ्यामधुनी । दुधाच्या धारा काढिल्या ।।४८।। प्रभु कोणा दिसला नाही । चराचरी तो भरता पाही । सद्‌गुरू कृपा जेव्हा होई । दिसे सर्वत्र नामदेवा ।।४९।। संत तुलसीदासे देखिला चराचरी । मार्ग उकलीला अंतरी । ब्रह्म माया दोन रूपांतरी । एकत्र होताच प्रगटे ।।५०।। वीज दाखवता नये । निगेटिव्ह पॉझिटिव्ह स्वये । जरी ट्रान्सफर जोडला असे । सद्‌गुरू बटन दाबता प्रगटे ।।५१।। नाम चतुर्गुण पंचतत्त्वे मिले । वाको द्विगुण प्रमाण । तुलसी आठसो भाग दीजिए । निचे बचा सो राम ।।५२।। कोणत्याही वस्तुचे नावास घ्यावे । अक्षरांची चौपट करावी । कारण चार पुरूषार्थ साधावी । पंचभूताचे पाच मिळवावे ।।५३।। त्या संख्येची दुप्पट करावी । अष्टधा प्रकृती ही आठ तत्त्वांची बनली आहे । पंच महाभुते + मन + बुद्धी + अहंकार म्हणून आठाने

भागावे । बाकी उरे दोन अक्षरे राम ।।५४।। यासाठी करावे लागे गुरू । रामाचे वसिष्ठ गुरू । सांदिपनी कृष्णाचे गुरू । गुरूवीणा व्यर्थ जीवन ।।५५।। वासुदेव गावोगावी फिरती । परमार्थ मार्ग दाविती । तेणे शिष्य मागे लागती । अनुग्रह घेण्यासी ।।५६।। गुरूची समाधी अेकतुनी । ते न देती अनुग्रह मुळी । गुरू आज्ञेवीण कर्मानी घात होईल शिष्याचा ।।५७।। मंडळी गेली शंकराचार्याजवळी । आपले गाऱ्हाणे सांगितली । शंकराचार्य वासुदेवा सांगती । मी आज्ञा देतो अनुग्रहासी ।।५८।। वासुदेव त्यांना पूज्य मानिती । परी गुरू आज्ञेवाण न देती । शिष्यास अेकतुनी जाती । आज्ञा मागण्या कारणे ।।५९।। सद्‌गुरू शिष्या परीक्षिती । वाघ रूपात रस्ता रोखती । परी वासुदेव ना भीती । गुरूनामे घाली लोटांगण ।।६०।। तोच वाघ अदृश्य झाला । समाधी पूजा सत्कार केला । गुरूसी संकेत सांगितला । येण्याचा ।।६१।। जर दगडी पादुकामधुन । औदुंबर उगवेल महिन्यात तीन । तरच अनुग्रह देईन । ही आज्ञा मानेल प्रमाण ।।६२।। वासुदेवांना सांगितल्याप्रमाणे । औदुंबर उगवले समाधातून । त्या पासाने अनुग्रह देऊन । उद्धरती भक्ताने ।।६३।। संत अमरदास वय तरूण । नाथ दीक्षा घेतली जाण । परी ध्यानातून चाळवी मदन । भंग पावे समाधी ।।६४।। भार टाकता देवावर । चिंता तोच निवारणार । वासुदेवराव टेंभुर्णीकर । भेट झाली तयांची ।।६५।। आपली अडचण सांगितली त्यांना । आपले वृद्धत्व मला द्याना । तेणे कह्यात ठेवीन मदना । सार्थ होईल जिवाचे ।।६६।। वासुदेव दयाळू माऊली । सर्वांवर कृपेची साउली । भक्त उद्धार ध्येय ठरली । जीवनभर सर्वदा ।।६७।। माझे तरूण वर्षे बारा । परमार्थ मार्गात खर्च करा । सार्थक

दोघांचे कल्याण करा । नाही म्हणू नकाच ।।६८।। लावताच रक्षा अमरदासास । वृद्धत्व संचरले देहास । हिमालयी गेला तपश्चर्येस । यौवन आले वास तपश्चर्येस । यौवन आले वासुदेवा ।।६९।। भक्ताघरी वासुदेव फिरती । निर्लोभ सेवा वृत्ती । कसलाही भार न भक्तावरती । दृष्टिक्षेप वृत्ति ।।७०।। वासुदेव नाव सुंदर । वासना सुटली ज्याची अपार । जाणा भावार्थ थोर । नाव झाले सार्थक ।।७१।। निर्लोभ सेवा आचरती । कधी न शिवले पैशासी । ऐसी नि:स्वार्थी निर्लोभ वृत्ती । भाग्ये गुरू लाभले ।।७२।। एकदा असा प्रसंग आला । पत्नी सुलोचना खिळली अंथरूणाला । श्वास लागून प्राण गेला । अमावास्या दिनी ।।७३।। हळहळती लोक फार । परी शंकेने केले कहर । अमावास्येस कां जावा प्राण । धर्मनिष्ठ संत असताना ।।७४।। ही ऐकून जनवाणी । वासुदेवा नेत्री आले पाणी । कीव करती जन अज्ञानी । काय करावे समजेना ।।७५।। सर्व असती उत्तम दीन । भेदभाव कसला जाण । भक्तांचे घालण्या अज्ञान । प्रार्थी ती देवा अखेर ।।७६।। हे नरसिंह कुल देवा । सत्वर घ्यावा धावा । फक्त अमावास्या टाळा । ऐवढीच विनंती मान्य करा ।।७७।। त्यांनी रक्षा लावता भाळी । चैतन्य स्फुरले अंतरी । नेत्र उघडले दोनी । वाचा फुटली सत्वरी ।।७८।। नाथ मज द्यावे पाणी । मी झोपली असता उठवले कोणी । आपण गीता वाचा स्वत:नी । विनंती माझी ऐकावी ।।७९।। सुलोचना बाईचा प्राण । गुढीपाडवा शुभदिन । सर्वांची जेवणे झाल्यावर । चार वाजतां स्वर्गा जाती ।।८०।। अमावास्या तर शुभ दिन । सूर्य चंद्र बंधू भेटे द्वैत विसरून । हा बोध घ्या त्यापासोन । बंधु मिलन उत्तम दिन ।।८१।। बघा प्रभुराम लक्ष्मण । बळीरामदादा कृष्ण

भगवान । विष्णू आणि शेषनारायण । द्वैत विसरूनि भेटती ।।८२।। ऐसे अद्वैतात मिलन होता । धडा घ्यावा आपण आता । आपण सुखदु:खात मिळता । आपली दृष्टी शुद्ध होईल ।।८३।। आनंद माना सुखदु:खात । तेणे विवेक प्रेम जागृत होत । गुरू शिष्य मिलन होता । विरून होती एकात्म ।।८४।। त्या वीण ना ब्रह्मप्राप्ती । ही तर मायेची भ्रांती । शेवाळ सारता बाजूसी ।। शुद्ध जल लाभेल ।।८५।। बदनापूरची तापडे सुलोचना । पन्नासी उलटली पाहाना । संसारवेलीवर फूल ना । तेणे निराशा जीवनी ।।८६।। डॉक्टर सांगती तीस । गर्भाशय दोषे न पुत्र आस । शरण गेली वासुदेवास । मंत्र उपासना दिली ।।८७।। पुत्र झाला राधेश्यामशेट । शेती दुकानदारी बदनापुरी करीत । औरंगाबाद जिल्ह्यासी ।।८८।। उठता बसताही येत ना । पन्नालाल तापडे यांना । पंढरपुरी वारीस जानवेना । चिंता पडली त्यासी ।।८९।। वय होते एकसष्ट । शेवटची वारी होणे इष्ट । पांडुरंगा आळविती तुष्ट । सद्गुरू वासुदेव येती घरा ।।९०।। सद्गुरूवर पूर्ण भाव । परीक्षा घेती पंढरी राव । वासुदेव विनविती भक्तासाठी धाव । करूणा येऊ दे नाथ ।।९१।। तोच जटाधारी हजर दारात विभूती लावण्यास देत । भिक्षा घेऊनी होती गुप्त । पंढरीनाथ ।।९२।। विभुती लावताच बरा झाला । पंढरपुरा वारीस गेला । वासुदेवास शरण गेला । सार्थक केले जन्माचे ।।९३।। केशव कुळकर्णी नानेगावकर । वेड लागले आजार । बरा केला उपासनेन । ऐसे महत्त्व उपासनेचे ।।९४।। उपासना शब्दाचा अर्थ । विना आस प्रभु आळविता । भक्ति, भावे, मन अर्पिता । प्रभु कृपा होय ।।९५।। बद्रीशेटाकडे होते लग्न । शेठ आजारी टॉयफाईडने

। कसे होईल चिंतन । गुरू वासुदेवास आळविती ।।९६।। वासुदेव रक्षा लाविती भाला । ताप उसनवारी घेतला । गुरूस ताप भरला । लग्न लागले सुखरूप ।।९७।। त्यानंतर ताप केला परत । कारण ज्याचा भोग तोच भोगत । भोग जे अपुरा राहत पुन्हा जन्म घ्यावा लागे ।।९८।। भोग न चुकला कोणा । देवादिकांनाही सुटेना । कृष्ण सांगती अर्जुना । गीतेत हेच तत्त्व ।।९९।। प्रेमाताई शामराव कुलकर्णी परभणी । नित्यनेम वासुदेव चरित्र वाचती । दृष्टांत देती स्वप्नी । आशीर्वादे भाग्य उजळे ।।१००।। ज्या दिवशी एरंडोलासी । अनुग्रह देती आम्हासी । औरंगाबादी नानेगावासी । कुळकर्णींना देती अनुग्रह ।।१०१।। गुरू चरित्री नृसिंहांनी । आठ ग्रामी घेती भिक्षा पुजोनी । एकाच वेळी त्याच दिनी । तैसे हेही अनंत रूपे घेत ।।१०२।। जोशी शकुंतला रत्नाकर । स्वप्नी दाविती काशी विश्वेश्वर । सार्थक होईल जीवन । उदय काल आला ।।१०३।। माझे आजारात आवाज गायब झाला अकस्मात । गुरू कृपेने परत येत । एक वर्षानी ।।१०४।। विमल मुरलीधर शिंपी असोदेकर । अत्यंत गरिबीचा होता संसार । गुरूकृपे झाली स्थावर । स्थैर्य लाभे मनास ।।१०५।। कमल सुकलाल शिंपी अमळनेर । ना स्थावर ना पैका जवळ । स्वत:चे घर झाले स्थावर । मुलास नोकरीही लागली ।।१०६।। सायंकाळी शेतातून परतत । पिंगळे नीळकंठ विष्णूशेठ । तोच वीज, वादळ, कडकडाट । झाडेही जेव्हा कोसळत । धावा करिती सद्‌गुरूचा ।।१०७।। जवळचे झाड पडले । परी सुखरूप वाचले । धन्य धन्य गुरू माऊले । नाम जपे तरले ।।१०८।। विमल विठ्ठल वाणी सिरिअस । भरवसा नव्हता मुळीच । वासुदेव तिज शाल अर्पित ।

गंडांतर पळाले ।।१०९।। रत्नाबाई दत्तूशेठ वाणी । निरक्षर म्हणूनी काचणी । वासुदेव कृपे जहाली स्वाध्यायी । सरस्वती बैसली जिव्हाग्री ।।११०।। दाभाडे, यमुताई माधवराव । देवी बोले देखुनी भक्तिभाव । गुरूवीण ना उद्धार होय । संथा घे वासुदेव दासाची ।।१११।। सिंधु श्रीराम लिंगे साळी । पडक्या देवळात दर्शना गेली । आत चुना दगडे ढासळू लागली । घाबरून पळाले इतर ।।११२।। मनी अचल, सिंधु उभी स्थिर । पूजेवीण ना परतणार । गुरूमाऊलीवर घालुनी भार । पूजा केली यथास्थित ।।११३।। देवळातून बाहेर आले तोच शिखर कोसळले । भाव श्रद्धे तरती भले । गुरोशीर्वाद लाभता ।।११४।। तीन ऑगस्ट नव्याण्णव दिन । मंगला सुरेश सोनार धुळयाहून । पुत्रासह ये मोटारीतून । एकनाथ गुरूजीसी भेटण्या ।।११५।। झाली रस्त्यात मोटारींची टक्कर । काही मेले, अपंग जखमी फार । गुरूनाम जप, जपे सत्वर । मुलगा सुखरूप बचावला ।।११६।। मंगलचा कपाळमोक्ष झाला, रक्तवाहे भळभळा । जखम दाबून आली बाहेरा । तोच वासुदेव प्रत्यक्ष हजर ।।११७।। किती वर्णू वासुदेव लीला । भर दुपारची वेळ । गुरू धरती छत्री त्यावर । दुसऱ्या मोटारीत बसवून । गुप्त होई क्षणात ।।११८।। किती वर्णू वासुदेव लीला । शेषहि थके वर्णिता लीला । भक्तांना सदा लाविती लळा । काय पाड मानयाचा ।।११९।। देवपूजेहून श्रेष्ठा मानस पूजा वरिष्ठ । विनासायास कमी कष्ट । आचरा माझ्या बंधुंनो ।।१२०।। आसनस्थ बसावे आसनी । ध्यान धरी नेट मिटुनी । देव किंवा गुरूमूर्ती स्मरोनी । बसावे एकांती क्षणभर ।।१२१।। नाम जपता उठे प्रेमलहरी । मन ऱ्हदय शुद्ध आधी करी । दया भाव ठेवोनी अंतरी । स्मरा निर्धारी

गुरूलीला ।।१२२।। गुरू पादुका पुजन । नामस्तोत्र हे भजन । तेणे वंश उद्धरे जाण । कलियुगी निर्धारे ।।१२३।। माथा ठेवोनि तुझ्या चरणी । प्रार्थना करितो हात जोडोनी । पूजा करितो यावे धावुनी । पूजा स्वीकारी प्रेमाने ।।१२४।। देवता, तीर्थे, संतजन । यांचे करूनी नाम स्मरण । तेच मंत्रसूक्त मानून । अभिषेकितो गुरूराया ।।१२५।। प्रक्षाळितो सद्‌गुरू चरण । पापाचे करीजे क्षालन । धारण करितो जहरी जाण । तेणे अंतर्बाह्य शुद्धी ।।१२६।। पद तीर्थ लावता नेत्री शिरी । उजळे ब्रह्म माया जाऊनी । मिलन करी शिवात्मा दोन्ही ।।१२७।। सद्‌भावाचे चंदन । निष्ठेवरी उगाळून । भक्तीजलात मिसळून । लावतो मी चरणावरी ।।१२८।। पंच वासनारूपी पंचामृत । वाहतो भावे चरणाप्रत । माया वस्त्राने कोरडे करीत ब्रह्मरूप दिसावया ।।१२९।। श्रद्धा प्रेमाच्या तंतूने निर्लोभतेच्या रंगाने भावयुक्त गंधाने । ऐसे वस्त्र समर्पितो ।।१३०।। भस्म चर्चून अष्टगंध लावून । संपूर्णता नि शुद्धता महान । वाहतो त्या अक्षता मनान । वेल, तुलसी, पुष्प गुरूसी ।।१३१।। सद्‌गुणांचा पुष्पहार आल्हाददायी । धूप भावे अर्पिता पायी । सद्‌वर्तनाच्या सर्व ठायी । दीप लावितो दयाळा ।।१३२।। धुपाने पाप जळत । कापुराने दैन्य जळत । दीपाने अज्ञान पळत । ज्ञान ज्योती प्रगटे ।।१३३।। नैवेद्यास्तव गुरूसी । साध्या सुग्रास अन्नासी । अर्पिता मी प्रेमराशी । त्याने व्हावे संतुष्ट ।।१३४।। पानीय आणि उपोषण । हस्तमुख प्रक्षालन । उटण्यासाठी चंदन । स्वीकारावे गुरूराया ।।१३५।। त्रयोदशगुणी तांबूल । पर्णे ज्यातील कोमल । कुटून घातले पुगीफल । बदाम केशर संयुक्त ।।१३६।। सद्‌भाव दक्षणा श्रीफळ । वाहतो मी गुरूचरणा

। प्रसन्न होऊनी गुरूचरणी ठाव देई त्वत्‌चरणी ।।१३७।।

**क्षमापन**

मी मतिमंद अज्ञान । न जाणे आवाहन । पूजा विधी समर्चन । नाही मजसी ठाऊक ।।१३८।। मंत्र नाही तंत्र नाही । क्रिया विधान तेही नाही । भक्तिभावाविना । कोरडा आहे सर्वदा ।।१३९।। या माझ्या उणियासी । कोण निवटील कृपाराशी । शरण आपुल्या चरणासी । आलो अनन्य भावाने ।।१४०।। आपल्या कृपेचा आधार । लाभता मला सत्वर । सर्व दैन्य दु:खापार । होईन देशसेवा परोपकार मी निश्चये ।।१४१।। कर्णी पडो संत कीर्ती । ऱ्हदयी राहो सदभक्ति । वाणी नामजपा वरती । राहो सदा गुंतोन ।।१४२।। देशसेवा परोपकार । घडो मजसी निरंतर । स्वार्थ बुद्धीसी अवसर । कधी न राहो वर्तनी ।।१४३।। संयम यावा वृत्तींना । सदा स्फुरावी सद्‌भावना । आळसादि दुर्गुणांना । थारा कधीही न उरावा ।।१४४।। कोणत्याही स्थितीत । शांत प्रसन्न राहो चित्त । समाधान वसो वृत्तीत । चंचलता टाको मन ।।१४५।। हेच गुरूचरणाशी । आहे मागणे विशेषी । बालकाने मातेसी । हितकर काय मागावे ।।१४३।। अज्ञाने केले हे स्तवन । गोड करी घेऊन । क्षमा पुन्हा मागून । वंदन चरणी अर्पितो ।।१४७।। भाग्य आपुल्या चरणाचे । लाधलो पूर्व सुकृत साचे । त्यात साफल्य जीवनाचे । लाभून झालो कृतार्थ ।।१४८।। आपुला वरदहस्त शिरी । आहेच आहे निरंतरी । तो स्पर्श कोमल परोपरी । यशवंतास सुखवीतसे ।।१४९।। गुरू नामे देतो नाम साधना । कर्ते करविते तेच ना । अहंकार नसावा मना । हाच बोध

वासुदेव दास, घेई ।।१५०।। जे कोणी कामनिक भक्त । येतील तुझ्या द्वाराप्रत । कामना पूर्ण करावी निश्चित । हेचि मागे वासुदेवदास ।।१५१।।

वासुदेवदास यशवंत विरचित । संत वासुदेव देव वरद स्तोत्र
उद्धरो सर्व भाविका प्रत । हेचि प्रार्थना

**- शांति पुष्टी तुष्टिच अस्तु -**

ॐ नमो भगवते सद्गुरू वासुदेवाय नम:
हे वरदस्तोत्र श्रावणशुद्ध ५ नागपंचमी प्रमार्थीनाम संवत्सरे
ता. १६ ऑगस्ट १९९९ समाप्त केले.

## आरती

आरती सद्गुरूनाथा । वासुदेवा समर्था ।
किती वर्णु निज मुखे । वर्णलिया होती सुखे ।।धृ।।
अज्ञाने जन किती । निजस्वरूप नेणती ।
पाहुनिया जनदु:खा । सर्वा देसी निजसुखा ।।१।।
अधिकार तुझा जाण । शेषालागी पडले मौन ।

ब्रह्मदिन स्थिर झाले । आहे सामर्थ्य आगळे ।।२।।
पाहुनिया निजदृष्टी । सुखी झालो उठाउठी ।
म्हणुन वासुदेवा । चरणी मागतसे ठाव ।।३।।

श्री संत सद्‌गुरू वासुदेवराव देव महाराज यांचे
सर्वात आवडते भजन

कृष्ण गोविंद गोपाल गाते चलो ।
मनको विषयोंके विषसे हटाते चलो ।।धृ.।।
इंद्रियों के न घोडे विषयों में अडे ।
जो अडे भी तो संयमके कोडे पडे ।
तनके रथको सुपथपर चलाते चलो ।।१।।
नाम जपते रहो काम करते रहो ।
पाप की वासना ओंसे डरते रहो ।
सद्‌गुणोंका परमधन कमाते चलो ।।२।।
लोग कहते हे भगवान आते नही ।
रूक्मिणीकी तरह हम बुलाते नहीं ।

द्रौपदीकी तरह धून लगाते चलो ।
लोग कहते है भगवान आते नही ।
भिल्लीणीकी तरह हम खिलाते नहीं ।
शाकप्रेमी विदुरसम जिमाते चलो ।।४।।
दुखमें तडपे नही सुख मे फुले नहीं ।
प्राण जाये मगर धर्म भुले नही ।
धर्म धनका खजाने लुटाते चलो ।।५।।
वक्त आवेगा ऐसा कभी ना कभी ।
हमभि पायेंगे प्रभुको कभी ना कभी ।
ऐसा विश्वास दिलमें जमाते चलो ।।६।।